# दिनांक 26/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 30

विषय – नगरपरिषद हद्दीत स्वच्छ सर्वेक्षणकामी लोखंडी बोर्ड जागेवर लावणे, पीट लावणे, शेडनेटची व्यसस्था करणे, डिजीटल बोर्ड चिटकविणे तसेच तदअनुषंगीक कामे करणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ – दिनांक 24/08/2022 रोजीची आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांची टिपणी.

नगरपरिषद हद्दीत स्वच्छ सर्वेक्षणकामी लोखंडी बोर्ड जागेवर लावणे, पीट लावणे, शेडनेटची व्यसस्था करणे, डिजीटल बोर्ड चिटकविणे तसेच तदअनुषंगीक कामे करणे आवश्यक आहे.सदरची कामे केलेस त्याचा फायदा येणा-या स्वच्छ सर्वेक्षण मध्ये होऊ शकतो. विटा नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियान तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विटा शहराचे सुवर्ण नगरी म्हणून देशभरामध्ये नावलौकीक आहे.सध्या स्वच्छ सर्वेक्षण 2023 ची कार्यवाही सुरू झालेली आहे. यासाठी लोखंडी बोर्ड जागेवर लावणे, पीट लावणे, शेडनेटची व्यसस्था करणे, डिजीटल बोर्ड चिटकविणे तसेच तदअनुषंगीक कामे करणेस मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 26/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.31

विषय – नगरपरिषद हद्दीत आत्मनिर्भर प्रभाग करणेसाठी प्रभाग क्रं.9मधील फुलेनगर पाण्याच्या टाकीजवळ, एकतानगर(घरकुल) व सुर्यनगर येथे कंपोष्ट पिटचे बांधकाम करणेबाबत निर्णय घेणे.(अं.र.रू.3,78,622/-)

संदर्भ – दिनांक 24/08/2022 रोजीची नगरअभियंता व मुख्याधिकारी यांची टिपणी.

शासन निर्णयानुसार स्वच्छ सर्वेक्षण मध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कमेचे विनियोग करण्याच्या कार्यपध्दतीतील अ.क्रं.3 1.मधील शहरातील सौदर्यीकरण कामातील कचरा मुक्त शहराच्या संकल्पनुनुसार शहरातील विविध ठिकाणचे कच-याचे ढिक काढून टाकल्यावर तेथील जागांचे सुशोभिकरण करणे,असे नमुद आहे. तरी नगरपरिषद हद्दीत आत्मनिर्भर प्रभाग करणेसाठी प्रभाग क्रं. 9 मधील फुलेनगर पाण्याच्या टाकीजवळ, एकतानगर(घरकुल) व सुर्यनगर येथे कंपोष्ट पिटचे बांधकाम करणेस मान्यता देत आहे. सदरचे काम प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कमेतून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा